## राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

### माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर,बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

तक्रार क्र. १९४३/२०१९/छ.संभाजीनगर
(द्वितीय अपील क्र.६७०/२०१९मध्ये)

श्री.रविंद्रकुमार राजाराम राऊत, : तक्रारदार
रा.प्लॉट नं.६ चौधरीचा वाडा,
न्यु गणेशनगर महादेव मंदिरासमोर,
निपट निरंजन मंदिराजवळ, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, : उत्तरवादी
अन्नधान्य वितरण अधिकारी,कार्यालय शहर,
छत्रपती संभाजीनगर

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी
अन्न धान्य वितरण अधिकारी,शहर,
छत्रपती संभाजीनगर

### निर्णय

(सुनावणी दि. २३.०४.२०२४)

तक्रारदार यांनी दि.१४.११.२०१९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.त्यामध्ये "तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे. व्दितीय अपील सुनावणीमध्ये दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी मला अद्यापर्यंत माहिती दिलेली नाही, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये तक्रारी अर्ज दाखल करीत आहे."

सदर आदेशाची अंमलबजावणी केली नाही,अशी तक्रार करुन संबंधितावर नियमानुसार कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्र.६७०/२०१९ मध्ये दि.२७.०५.२०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले होते.

"वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या जोडपत्र "अ" मध्ये नमूद प्रमाणे परिपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात अपिलार्थीस नोंदणीकृत टपालने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. "

सदर प्रकरणावर आज दि.२३.०४.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. सदर सुनावणीला तक्रारदार आणि त्यांच्यासोबत श्री.ईश्वरचंद सोपानराव पट्टेबहादूर व

श्रीमती आर.एस.बारोटे,विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा महसूल सहायक,अन्नधान्य वितरण कार्यालय शहर विभाग छत्रपती संभाजीनगर तसेच श्रीमती ज्योती आर.गरुड, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन अन्नधान्य वितरण कार्यालय शहर विभाग,छत्रपती संभाजीनगर (सध्या कार्यरत जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर) सुनावणीसाठी उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी तक्रारदार त्यांच्या प्रतिनिधी यांनी केलेल्या युक्तिवादानुसार ऑनलाईन शिधापत्रिकाची नोंद अंत्योदय कशी करण्यात आली अशी विचारणा केली, त्यावेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, आर सी एम एस प्रणाली मध्ये आधारलिंक करताना स्वत: धान्य दुकानदार यांच्यामार्फत कागदपत्र जमा करण्यात आलेल होते. तद्नतंर शि.प. ऑनलाईन करण्याचे काम एका संस्थेला देण्यात आले होते, त्यामुळे मुळ कागदपत्राच्या सत्यप्रतीचा अहवाल सही आणि आधार नंबर कार्डसह या कार्यालयात उपलब्ध नाही. सदरील शिधापत्रिकाची मुळ प्रत या कार्यालयामार्फत वितरीत करण्यात आलेली नाही. तसे त्यांनी तत्कालीन अन्न धान्य वितरण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांच्या स्वाक्षरीने दि.०९.०१.२०२० रोजीच्या पत्राद्वारे तक्रारदारास कळविले आहे. त्याअनुषंगाने विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की,तक्रारदार यांना शिधापत्रिका तयार करुन पाहिजे असल्यास त्यांनी प्रचलित पध्दतीनुसार सेतु सुविधा केंद्रमार्फत अर्ज करुन शिधापत्रिका प्राप्त करुन घेवू शकतात.

यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशांची अंमलबजावणी केली असल्याचे स्पष्ट होते. तसेच तक्रारदार यांनी शिधापत्रिकासाठी सबंधित प्राधिकरणाकडे अर्ज करुन ती प्राप्त करुन घ्यावी. यासर्व वस्तुस्थिती विचारात घेता सदरची तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब,आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त विवेचनानुसार सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

तक्रार क्र.१९४३/२०१९/छत्रपती संभाजीनगर जावक क्र. 6347 /२०२४ दिनांक : 23/04/2024